सकाळ TODAY

अवतीभवती

ज्ञानप्रकाश प्रकल्पात सायबर सुरक्षेची शपथ

लातूर : ज्ञानप्रकाश शैक्षणिक व सामाजिक प्रकल्प येथे क्विक हील फाउंडेशन कंपनीच्या साह्याने 'सायबर सुरक्षा' या विषयावर एकदिवसीय जाणीव सत्र आयोजित करण्यात आले. यात आठवी ते दहावीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. राजर्षी शाहू महाविद्यालयातील साहिल जाधव, परमेश्वर पांढरे, नेहल बुलानी, नम्रता तावर यांनी मार्गदर्शन केले. नेहल यांनी आपण ओळख नसलेल्या व्यक्तींशी समाज माध्यमावर मैत्री करतो, विश्वास ठेवतो. त्यातच आपण अनेकवेळा फसतो किंवा आपली फसवणूक होते. त्यामुळे कायम सावध राहिले पाहिजे. साहिल जाधव यांनी हसत-खेळत गेमिंग, पासवर्ड, त्यातील बारकावे मुलांना समजावून दिले. शेवटी मुलांना सायबर सुरक्षेची शपथ देण्यात आली.